# ऊसाच्या फडावरील आशा 'आरोग्य सखी' : महिला ऊसतोड कामगार संघटनेचा अभिनव' प्रयोग



'महिला किसान अधिकार मंच' (मकाम) संलग्नित 'महिला ऊसतोड कामगार संघटना', बीड आणि हिंगोली जिल्ह्यातील ८० गावांमध्ये गेल्या चार वर्षांपासून काम करत आहे. ऊसतोड कामगार म्हणून मान्यता, स्थलांतराच्या काळात सोयी-सुविधा, रेशन, गावात रोजगार आणि आरोग्य सुविधा यांसारख्या मुद्द्यांवर संघटना लक्ष केंद्रित करत आहे. विशेषत: ऊसतोड कामगारांसाठी फडावर आणि गावात आरोग्य सेवा मिळवण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. यश-अपयश अनुभवत 'महिला ऊसतोड कामगार संघटना', सोपेकॉम संस्थेच्या सहाय्याने अनेक प्रयोगांची चाचपणी करत, शासनाच्या माध्यमातून हे प्रयोग सर्वत्र लागू होतील या प्रयत्नात काम करत आहे.

## ऊसाच्या फडावरील आशा 'आरोग्य सखी'

ऊसतोड कामगार स्थलांतराच्या ठिकाणी अत्यंत हालाखीच्या आणि प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगतात. पिण्याच्या पाण्याची टंचाई, अस्वच्छता, अत्यधिक शारीरिक श्रम, अपुरी विश्रांती आणि आरोग्य सेवा-सुविधांचा अभाव असल्यामुळे या कामगारांमध्ये आजारांचे प्रमाण अधिक आहे. आजारी पडल्यावर त्यांना अनेकदा खाजगी दवाखान्यात जावे लागते, किंवा स्थानिक औषध दुकानातून औषधे घ्यावी लागतात. परिणामी, त्यांच्यावर मोठा आर्थिक बोजा पडतो. यावर पर्याय म्हणून 'सोपेकॉम' संस्थेने **"आरोग्य सखी"** हा अभिनव प्रयोग राबवला. बीड व हिंगोली जिल्ह्यातील, पुढील हंगामात ऊसतोडीसाठी स्थलांतरित होणाऱ्या, २५-३५ वयोगटातील किमान लिहिता वाचता येणाऱ्या २० महिला ऊसतोड कामगारांची निवड करण्यात आली. या ऊसतोड कामगार महिलांनी स्थलांतराच्या काळात स्वतःच्या व आजूबाजूच्या टोळीतील ऊसतोड कामगारांना प्राथमिक आरोग्य सुविधा पुरवाव्या व त्यांचा खर्च वाचवावा हे या प्रयोगाचे उद्देश होते. त्यामुळे त्यांना आरोग्य सखी म्हणून संबोधण्यात आले.

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या 'अनुसंधान ट्रस्ट – साथी' या संस्थेतील अनुभवी प्रशिक्षकांच्या मदतीने, आरोग्य सखींना प्रशिक्षण देण्यात आले. आरोग्य सखींना प्रशिक्षण देताना त्यांना सहज आणि सोप्या पद्धतीने समजावे यासाठी चित्रमय पुस्तकाचा (मोड्यूल) वापर करण्यात आला. या प्रशिक्षणामध्ये अनेक उपयुक्त विषयांचा समावेश होता जसे की, साध्या आजारांवर उपचार (अंगदुखी, डोकेदुखी, ताप, जुलाब- उलट्या), जखमांची काळजी, स्वच्छता, मासिक पाळी व्यवस्थापन, गरोदर महिलांसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन, पाणी शुद्धीकरण, संदर्भ सेवांची माहिती. तसेच फडावर शौचालय आणि बाथरूमची व्यवस्था असावी ह्याबाबत जागृती, स्थानिक आरोग्य यंत्रणांसोबत समन्वय साधणे (आशा, अंगणवाडी सेविका, नर्सताई, आरोग्य केंद्राचे डॉक्टर), तसेच विविध सरकारी आरोग्य योजनांबद्दल माहिती देण्यात आली.

## औषधांचा तक्ता

| गोळीचे नाव | केव्हा घ्यावी? | दिवसातून किती वेळा | | | | किती दिवस | मोठामाणूस १२ वर्ष पुढे | मोठे मूल ८ ते १२ वर्ष | मध्यम मूल ४ ते ७ वर्ष | लहान मूल १ ते ३ वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पॅरा | ताप / अंगदुखी | ✔ | ✔ | ✔ | ✔ | १ | | | | |
| फ्युरा | २ दिवसापेक्षा जास्त जुलाब | ✔ | ✔ | | ✔ | ३ | | | | |
| डोम | उलटीसाठी | ✔ | | | | १ | | | | |

प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर आरोग्य सखींना प्राथमिक उपचारासाठी लागणाऱ्या आवश्यक सामग्री असलेली औषधांची पेटी देण्यात आली. उपचार करताना आरोग्य सखींना औषधांची ओळख सहज आणि अचूक करता यावी, यासाठी औषधांच्या डब्यांवर संबंधित आजारांच्या उपचारानुसार स्पष्ट चित्रे आणि औषधांचे नाव मोठ्या व वाचनीय अक्षरात चिकटवण्यात आले. यामुळे कोणत्या आजारासाठी कोणते औषध द्यायचे, हे त्यांना त्वरित ओळखता आले. यासोबतच, औषधांचा वापर अधिक अचूक आणि सुरक्षित व्हावा व आरोग्य सखींना औषधांच्या वापराबाबत अधिक मार्गदर्शन मिळावे या हेतूने सोपी, चित्रमय आणि टप्प्याटप्प्याने समजावून सांगणारी पुस्तिकाही देण्यात आली.

ही औषधांची पेटी घेऊन आरोग्य सखी ऊस तोडणीच्या ठिकाणी ऊसतोड कामगारांवर उपचार करू लागल्या. काही आरोग्य सखींनी केवळ स्वतःच्या टोळीपुरते मर्यादित न राहता आजूबाजूच्या टोळीतील कामगारांनाही उपचार दिले. एका टोळीत अंदाजे २० लोक धरले, तरी आरोग्य सखी जवळपास ५०० ऊसतोड कामगारांपर्यंत पोहोचू शकल्या. २० पैकी १२ आरोग्य सखींनी त्यांना दिलेल्या नोंदवहीत रुग्णाची माहिती, उपचार, औषधांचा डोस याची नोंद केली. नोंदींचे विश्लेषण केल्यावर, 'आरोग्य सखी' चा प्रयोग यशस्वी होत असल्याचे दिसून आले. नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ या पाच महिन्यांच्या कालावधीत, आरोग्य सखींनी केलेल्या नोंदीवरून दिसून आले की त्यांनी एकूण ३४९ रुग्णांवर ८५५ वेळा विविध आजारांसाठी उपचार केले. प्रत्येक आजारपणाच्या वेळी कामगारांना खासगी दवाखान्यात जाण्या-येण्यासाठी, तपासणीसाठी व औषधांसाठी अंदाजे ५०० रुपये खर्च करावा लागतो. याशिवाय सुट्टी घेतल्यामुळे टोळीला प्रती व्यक्ती ६००/- रुपये दंड भरावा लागतो. या हिशोबाने केवळ पाच महिन्यात आरोग्य सखींच्या कामामुळे या कामगारांचे अंदाजे ४.२७ लाख रुपये वाचले (दंडाची रक्कम न धरता).

आरोग्य सखींच्या कामामुळे ऊसतोड कामगारांना साध्या आजारांवर वेळीच आणि कमी खर्चात उपचार मिळू लागले आहेत. विशेष म्हणजे, बीड जिल्हा आरोग्य विभागाने या प्रयोगाला पाठबळ दिले आहे. दुसऱ्या वर्षी आरोग्य सखींना औषधांचा साठा बीड आरोग्य विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आला, ज्यामध्ये पॅरासिटॅमॉल, डोमपरिडोन, फ्युराझोलिडोन, कापूस, बँडेज, कॅल्शियमच्या गोळ्या आणि इतर औषधांचा समावेश होता. या सहकार्यामुळे आरोग्य सखी अधिक सक्षमपणे व नियमितपणे ऊसतोड कामगारांना सेवा पुरवू शकल्या. तसेच हिंगोलीच्या जिल्हा आरोग्य विभागानेही पुढील हंगामात (२०२५-२६) औषधांचा साठा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे.

बीड जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या उपस्थितीत दिनांक २७ मार्च २०२५ रोजी 'आरोग्य सखी' हा प्रयोग समजून घेण्यासाठी बैठक लावली होती. सोपेकॉम संस्थेतील प्रतिनिधी, आरोग्य तज्ञ व महिला ऊसतोड कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी त्यावेळी प्रयोग कसा राबवला, त्याचे फायदे, ते शासनाच्या स्तरावर राबविल्यास होणारे फायदे, त्याची यंत्रणा, व आर्थिक बाबींविषयी मांडणी केली. सदर बैठकीत या प्रयोगाची दखल घेऊन, बीड जिल्ह्यातील अभिनव व नाविन्यपूर्ण कार्यक्रम म्हणून 'आरोग्य सखी" मॉडेल बीड जिल्ह्यात लागू करण्याबाबत सकारात्मक प्रतिक्रिया व मांडणी मुख्य कार्यकारी अधिकारींनी केली. हा प्रयोग शासनाच्या स्तरावर राबविला गेल्यास ऊसतोडणीच्या ठिकाणी टोळीतील लोकांना साध्या आजारांवर उपचार देता येतील, टोळीतील माहिती शासनाला मिळू शकेल तसेच गरोदर व स्तनदा मातांना मदत होऊ शकेल. या यशस्वी प्रयोगाच्या आधारावर महिला ऊसतोड कामगार संघटनेची मागणी आहे की हा प्रयोग शासनाने राबवावा. या प्रकीयेमध्ये महिला ऊसतोड कामगार संघटना शासनाच्या सोबत असेल .

हा प्रयोग ज्या जिल्ह्यातून ऊसतोड कामगार स्थलांतरीत होतात त्या जिल्ह्यांमध्ये राबविण्याची गरज आहे. राज्य सरकार आणि ऊसतोड महामंडळाने या प्रयोगाची दखल घेऊन तो सार्वत्रिक केल्यास ऊसतोड कामगारांच्या आरोग्य सुविधा मिळवण्यातील काही अडचणी दूर होतील. सरकारी आरोग्य सेवांवरील विश्वास वाढवण्यासाठी व सार्वजनिक आरोग्य यंत्रणा या कामगारांपर्यंत पोहोचण्यासाठी या 'आरोग्य सखी' **ऊसाच्या फडावरील 'आशा'** म्हणून नक्कीच काम करू शकतील. या प्रयोगामुळे केवळ आरोग्य सेवा सुधारणार नाहीत, तर कामगारांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व आणि सरकारी सेवांचा उपयोग याबाबत जागृतीही निर्माण होईल.

महिला ऊसतोड कामगारांमध्ये गर्भवती महिला, स्तनपान करणाऱ्या माता आणि लहान बालकांची संख्या लक्षणीय आहे. आरोग्य सखी, माता आणि बाल आरोग्य सेवांवर विशेष भर देऊ शकतील. आरोग्य सखींचे प्रशिक्षण, वैद्यकीय किट्स आणि डिजिटल साधनांचा वापर करून त्यांची कार्यक्षमता वाढवता येईल.

## 'ऊसाच्या फडावरची आशा' मॉडेल शासन स्तरावर राबविण्यासाठी प्रस्ताव-

सततच्या स्थलांतरामुळे ऊसतोड कामगारांना स्थलांतरित गावात आरोग्य सेवा पुरविण्यात, शासकीय यंत्रणेला अनेक अडचणी येतात. मात्र, त्यांच्या टोळीत प्रशिक्षित आरोग्य सखी असल्यास स्थलांतराच्या काळात प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे सुलभ होऊ शकते. त्यामुळे महिला ऊसतोड कामगार संघटनेची मागणी आहे की, शासनाने पुढील नमूद केलेला आरोग्य सखीचा उपक्रम राबवावा.

- ज्या गावांमधून कामगार स्थलांतरित होतात, तेथून स्थलांतरित होणाऱ्या प्रत्येक टोळीतील एक किमान सातवी शिक्षित महिला ऊसतोड कामगार 'आरोग्य सखी' म्हणून नियुक्त करून तिला आरोग्य वर्धिनी केंद्रामार्फत (HWCs) प्रशिक्षण देण्यात यावे.
- सखीला समुदाय आरोग्य कार्यकर्त्याचे प्रमाणपत्र देऊन, तिला स्थानिक आरोग्य यंत्रणेशी अधिकृतपणे जोडावे.
- आशा पर्यवेक्षक व CHO तिच्यावर देखरेख ठेवू शकतील.
- आरोग्य सखींना स्थलांतरित गावात औषध रिफिल, संदर्भ सेवा व हेल्पलाइनची सुविधा आरोग्य विभागामार्फत असावी.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), कामगार विभाग, लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ व साखर कारखान्यांनी या उपक्रमाला मान्यता द्यावी.
- प्रशिक्षण, औषध किट्स व मानधनासाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) आणि कॉर्पोरेट सोशल रेसपोन्सिबीलिटी (CSR) निधीतून तरतूद करता येऊ शकेल. साखर खरेदी करणाऱ्या कंपन्यांनीही CSR अंतर्गत योगदान द्यावे.
- सोबतच आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग, लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, जिल्हा परिषद, स्थानिक आरोग्य संस्था, स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग असलेले टास्क फोर्स, आरोग्य सखींच्या कामावर नियंत्रण ठेवेल व त्यांना आलेल्या अडचणी सोडवण्यात मदत करेल.
- प्रत्येक आरोग्य सखीवर सरासरी 2500 रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यात आरोग्य सखींचे प्रशिक्षण, मोड्युल तयार करणे, स्टेशनरी, प्रशिक्षण स्थळ, प्रवास खर्च इत्यादींचा समावेश आहे. तसेच राज्य सरकारच्या 'आशा' योजनेसारखेच 'आरोग्य सखी' उपक्रमासाठी मानधन निश्चित करावे, जेणेकरून त्या ऊसतोडणीच्या कामातून वेळ काढून उपचार करू शकतील.





“लोक मला ‘फडावरची आशा’ म्हणायचे, ते ऐकून खूप छान वाटायचं. मी आमच्या टोळीतल्या ५७ लोकांवर उपचार केले. जिथे आम्ही उतरलो होतो, तिथून दवाखाना लांब असल्याने कामगार रात्री उशिरा, बारा वाजेपर्यंतही माझ्याकडे यायचे. दिवसभर कष्टाचे काम त्यामुळे महिलांमध्ये कंबरदुखी, डोकेदुखी यांसारखे आजार जास्त दिसायचे. पॅराच्या गोळ्या आणि बँडेज संपायच्या, त्यामुळे पुन्हा पुन्हा गोळ्या मागवाव्या लागायच्या.”

**- अरुणा घोंगडे,** आरोग्य सखी
गाव- जलालदाभा, तालुका- औंढा नागनाथ, जिल्हा- हिंगोली.

***



“मी ‘आरोग्य सखी’ असल्यामुळे टोळीतले सगळे माझ्याकडे उपचारासाठी यायचे. मी एकूण ४७ लोकांवर उपचार केले, प्रत्येकजण दोन-तीन वेळा तरी आला असेल. यामुळे किमान १०-१२ हजार रुपये वाचले असतील. माझ्या मुलीला मासिक पाळीत पोटदुखी व्हायची. पूर्वी ऊसतोडीला गेल्यावर अशा वेळी काम थांबवून दवाखान्यात जावे लागायचे आणि १०-१५ हजार खर्च व्हायचे. पण यावर्षी मी तिच्यावर घरीच उपचार केले, पैसे वाचल्याचा मला आनंद झाला.”

**- साधना वाघमारे,** आरोग्य सखी
गाव- काठोडा, तालुका व जिल्हा- बीड

***



“फडातील लोक ‘मॅडम’ म्हणायचे. “मॅडम, तुमचे खूप उपकार झालेत, पट्टी वेळेवर केली नसती तर रक्त खूप गेले असते,” असे लोक म्हणायचे. टोळीतील विहिरीचे पाणी खराब असल्याने सगळ्यांना जुलाब व्हायचे. मी स्वतःच्या पैशातून क्लोरिन आणि तुरटी आणून पाणी स्वच्छ करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. हे मला ‘आरोग्य सखी’च्या प्रशिक्षणात शिकवले होते. यार्षी माझ्या सांगण्यावरून सगळ्यांनीच बाथरूम (तात्पुरते) बांधले.”

**- कल्पना थोरात,** आरोग्य सखी
गाव - पिंपळवाडी, तालुका व जिल्हा- बीड



“जवळपास मी ४९ लोकांवर उपचार करून त्यांचा खर्च वाचवला. त्यामुळे टोळीतील लोकांना माझा आधार वाटायचा. तापाचे पेशंट जास्त असायचे. त्यामुळे माझ्याकडच्या ‘पॅरा’च्या गोळ्या जास्त संपल्या. सगळे मला ‘डाक्टरीन’ म्हणायचे. कोणी आजारी पडलं की ‘हाय आपल्याकडं डाक्टरीनं’ असे म्हणायचे.”

**- सुवर्णा असोले,** आरोग्य सखी
गाव- पिंपळदरी, तालुका व जिल्हा- हिंगोली

***



“ऊसतोडीला आम्ही कर्नाटकात गेलो होतो. या काळात मी एकूण ६५ लोकांवर उपचार केले. मासिक पाळीत कंबरदुखीसाठी ‘पॅरा’च्या गोळ्या दिल्या आणि स्वच्छतेबाबत बायांना मार्गदर्शन केले. ऊसतोडीच्या ठिकाणी आशा वर्करचा नंबर मिळवून लसीकरण आणि आहाराबद्दल विचारले, पण राज्य बदलल्याने ती काही करू शकत नाही, असे म्हणाली. दुसऱ्या राज्यातही सरकारी आरोग्य सेवा मिळायला हवी. ‘आरोग्य सखी’ कार्यक्रम सुरू राहावा, अशी माझी इच्छा आहे.”

**- ज्योती थोरात,** आरोग्य सखी
गाव - काठोडा, तालुका व जिल्हा- बीड

***



‘आरोग्य सखी’ म्हणून फडावर औषधांची पेटी घेऊन रवाना झाले. टोळीतील लोक बोर आणि नदीचं पाणी प्यायचे, ज्यामुळे जुलाब झाले. सर्वांना ‘फ्युरा’ दिलं आणि पाणी स्वच्छ करण्यासाठी क्लोरिन वापरायला सांगितलं. ८० पेशंटवर ताप, जुलाब, अंगदुखीसाठी उपचार केले. ‘पॅरा’ आणि ‘फ्युरा’ गोळ्या जास्त संपल्या. फडावर शुद्ध पाण्याची व्यवस्था होणं आवश्यक आहे.”

**- आम्रपाली डोंगरे,** आरोग्य सखी
गाव -चारदरी, तालुका- धारूर, जिल्हा- बीड

***



“माझ्याकडची औषधांची पेटी पाहून सगळ्यांना आनंद झाला. मी १६ लोकांवर उपचार करून १५ ते २० हजार रुपये वाचवले. पोरांच्या लसीकरणासाठी दोन वेळा आशा वर्करला भेटायला गेले, पण ती भेटली नाही. नंतर नवऱ्याला तिच्या घरी पाठवून तिला निरोप दिला. तिने लसीकरणाची वेळ व जागा कळवली आणि पोरांचं लसीकरण करून घेतलं.”

**- अलका कपाटे,** आरोग्य सखी
गाव- मौजा, तालुका व जिल्हा- हिंगोली


**सोसायटी फॉर प्रमोटिंग पार्टिसिपेटीव इकोसिस्टम मॅनेजमेंट (सोपेकॉम)**

gender.soppecom@gmail.com
www.soppecom.org
youtube.com/@soppecom
पल्लवी हर्षे - 8446425667
आरती बनकर - 7028483865

**महिला ऊसतोड कामगार संघटना**

mahilaustod@gmail.com
facebook.com/MahilaUstodKamgar
instagram.com/mahilaustodkamgarsanghtana
मनीषा तोकले - 9325056893
छाया पडघन - 9850074283